# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं. १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई – ४०० ००५.
टेलि. नं. (०२२) २२१६३ ९६४ / ६५ / ६९; फॅक्स (०२२) २२१६ ३९ ७६
ई–मेल : mercindia@mercindia.org.in ● संकेतस्थळ : www.mercindia.org.in

## पाहिजेत

जाहिरात क्र. १९/२०११-१२

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) नव्याने निर्माण झालेली पदे सरळ सेवेच्या तत्त्वावर भरण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | आरक्षण |
|---|---|---|---|
| १. | सहाय्यक संचालक | ४ | २ अराखीव, १ अजा, १ अज |
| २. | संगणक प्रणाली प्रशासक | १ | अराखीव |
| ३. | डाटाबेस / वेब प्रशासक | १ | अराखीव |
| ४. | स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी) | १ | अजा |
| ५. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी) | १ | अराखीव |
| ६. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी) | १ | अराखीव |
| ७. | लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक | ३ | २ अराखीव (१ महिला), १ विजा (अ) / भज (ब) / भज (क) / भज (ड) |
| ८. | ग्रंथपाल-नि-कार्यालयीन सहाय्यक | १ | अराखीव |
| ९. | वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक | १ | १ अज |
| १०. | शिपाई | ४ | २ अराखीव (१ महिला), १ विजा (अ) / भज (ब) / भज (क) / भज (ड), १ इमाव |

- वर नमूद केलेल्या आरक्षित पदांची संख्या आयोगाच्या बिंदू नामावलीच्या प्रस्तावास शासनाच्या मान्यतेस अधिन राहून असेल.
- लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यकाच्या २ अराखीव पदापैकी १ पद महिलांसाठी राखीव राहील.
- लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यकाचे १ पद विजा (अ) साठी राखीव राहील. तथापि, विजा (अ) या प्रवर्गातील सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, भज (ब) किंवा भज (क) किंवा भज (ड) या प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.
- शिपाई पदाच्या २ अराखीव पदापैकी १ पद महिलांसाठी राखीव राहील.
- शिपाई पदाच्या ४ राखीव पदापैकी १ पद विजा (अ) साठी राखीव राहील. तथापि, विजा (अ) या प्रवर्गातील सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, भज (ब) किंवा भज (क) किंवा भज (ड) या प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

| अ. क्र. | पदाचे नाव आणि वेतनश्रेणी (रु.) | वय | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | **सहाय्यक संचालक (तांत्रिक)**<br>(९,३००–३४,८००<br>ग्रेड पे – ४,४००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातून विद्युत / पॉवर अभियांत्रिकीमधील पदवी.<br>किंवा<br>(ब) मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीसह एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ / संस्थेमधील एमबीए किंवा अर्थशास्त्र/गणितशास्त्र/सांख्यिकी/पर्यावरण शास्त्र यामधील पदव्युत्तर पदवी किंवा कॉस्ट अकाउन्टंट. | (अ) विद्युत क्षेत्र / विद्युत कंपनी / परवानाधारक / नियामक आयोगामध्ये कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक. |
| २. | **संगणक प्रणाली प्रशासक**<br>(९,३००–३४,८००<br>ग्रेड पे – ४,४००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेतून संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान पदविका आणि रेड हॅट सर्टीफाईड इंजिनिअर (आरएचसीइ).<br>किंवा<br>(ब) संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान विषयात पदवी किंवा संगणक विज्ञान /माहिती तंत्रज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी आणि रेड हॅट सर्टीफाईड इंजिनिअर (आरएचसीइ). | (अ) केंद्र / राज्य शासकीय विभाग उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग किंवा प्रख्यात सॉफ्टवेअर/हार्डवेअर कंपन्यांमधील संगणक प्रणाली प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) कामाचा ४ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य. |
| ३. | **डाटाबेस / वेब प्रशासक**<br>(९,३००–३४,८००<br>ग्रेड पे – ४,४००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेतून संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान पदविका आणि ओरॅकल प्रमाणित.<br>किंवा<br>(ब) संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान विषयात पदवी किंवा संगणक विज्ञान/माहिती तंत्रज्ञान पदव्युत्तर पदवी आणि ओरॅकल प्रमाणित. | (अ) केंद्र / राज्य शासकीय विभाग, उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग किंवा प्रख्यात सॉफ्टवेअर/हार्डवेअर कंपन्यांमधील डाटाबेस प्रशासनाचा आणि वेब डिझायनिंग/प्रोग्रामिंग / ओरॅकल डाटाबेस कामाचा ४ वर्षांचा अनुभव आवश्यक;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य. |
| ४. | **स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी)**<br>(९,३००–३४,८००<br>ग्रेड पे – ४,४००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.<br>(ब) लघुलेखनाची प्रति मिनिट १२० शब्द आणि टंकलेखनाची प्रति मिनिट ४० इंग्रजी शब्दांची गती असल्याचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र असणे आवश्यक. | (अ) ५ वर्षांचा कामाचा अनुभव, शासकीय विभाग किंवा सार्वजनिक उपक्रम किंवा सार्वजनिक कंपनीमधील स्वीय सहाय्यक म्हणून काम केलेले असल्यास अधिक पसंती;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) मायक्रोसॉफ्ट ऑफिसमध्ये (एमएस-वर्ड, एमएस-एक्सेल, एमएस-पॉवर पॉईन्ट सादरीकरण, एमएस-आऊटलूक इ.) प्राविण्य. |
| ५. | **उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी)**<br>(९,३००–३४,८००<br>ग्रेड पे – ४,४००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.<br>(ब) लघुलेखनाची प्रति मिनिट १२० शब्द आणि टंकलेखनाची प्रति मिनिट ४० मराठी शब्दांची गती असल्याचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र आवश्यक.<br>(क) इंग्रजीतून मराठीत भाषांतर कौशल्य असणे आवश्यक. | (अ) ५ वर्षांचा कामाचा अनुभव, शासकीय विभाग किंवा सार्वजनिक कंपनी किंवा सार्वजनिक उपक्रमात उच्च श्रेणी लघुलेखक (मराठी) म्हणून काम केलेले असल्यास अधिक पसंती;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक. |
| ६. | **उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी)**<br>(९,३००–३४,८००<br>ग्रेड पे-४,४००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.<br>(ब) लघुलेखनाची प्रति मिनिट १२० शब्द आणि टंकलेखनाची प्रति मिनिट ६० इंग्रजी शब्दांची गती असल्याचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र आवश्यक. | (अ) ५ वर्षांचा कामाचा अनुभव, शासकीय विभाग किंवा सार्वजनिक उपक्रम किंवा सार्वजनिक कंपनीत उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) म्हणून काम केलेले असल्यास अधिक पसंती;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक. |
| ७. | **लिपिक-टंकलेखक नि कार्यालय सहाय्यक**<br>(५,२००–२०,२००<br>ग्रेड पे-१,९००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.<br>(ब) संगणक ॲप्लिकेशन्स मधील पदविका / प्रमाणपत्र. | (अ) संगणक वापरासह एमएस ऑफिस सूट/विंडोज ऑपरेटिंग सिस्टीम, इंटरनेट आणि ई-मेल ॲप्लिकेशन्स यांच्या अगदी अलिकडच्या आवृत्ती वापरण्याच्या प्रत्यक्ष कामाचा १ वर्षांचा अनुभव;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य. |
| ८. | **ग्रंथपाल-नि-कार्यालयीन सहाय्यक**<br>(५,२००–२०,२००<br>ग्रेड पे-१,९००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेची कोणत्याही शाखेतील पदवी.<br>(ब) ग्रंथालय विज्ञान पदवी असणाऱ्यास प्राधान्य. | (अ) प्रख्यात संस्थेत ग्रंथालय देखभालीच्या कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक. |
| ९. | **वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक**<br>(५,२००–२०,२००<br>ग्रेड पे-१,९००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | (अ) शासनमान्य शाळेतून ८ वी इयत्ता उत्तीर्ण.<br>(ब) ५ वर्षांचा हलकी मोटर वाहने चालविण्याचा परवाना. | (अ) किमान ५ वर्षे मोटर वाहने चालविण्याचा अनुभव.<br>(ब) वाहने चालविण्याचा स्वच्छ रेकॉर्ड आणि मोटर वाहने किंवा जीप दुरुस्तीचे कामचलाऊ ज्ञान.<br>(क) स्थानिक क्षेत्राची आणि मार्गांची माहिती असली पाहिजे. |
| १०. | **शिपाई**<br>(४,४४०–७,४४०<br>ग्रेड पे-१,३००) | उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे. | शासनमान्य शाळेतून ८ वी इयत्ता उत्तीर्ण असणे आवश्यक. | (अ) चांगली शरीरयष्टी आवश्यक.<br>(ब) कार्यालयीन कामकाजाचा अनुभव.<br>(क) मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.<br>(ड) संगणक विषयक ज्ञान असल्यास अधिक पसंती. |

इच्छुकांनी आपले अर्ज संपूर्ण तपशीलासह विहित नमुन्यामध्ये आयोगाचे सचिव यांच्याकडे वरील पत्त्यावर पोस्टाने किंवा कुरियरमार्फत सोमवार, दि. ०९.०१.२०१२ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा बेताने पाठवावेत.

अनुक्रमांक ९ व १० येथील पदांकरिता, जे उमेदवार व्यक्तिश: विनंती करतील त्यांना प्रति अर्जाकरिता रु. २०/– चा भरणा केल्यास आयोग त्यांना छापील अर्ज उपलब्ध करून देईल.

अधिक तपशीलासाठी, आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेतस्थळाला कृपया भेट द्यावी.

सही/–
(कुलदीप ना. खवारे)
सचिव, मविनिआ

ठिकाण – मुंबई
दि. १०.१२.२०११